तीळ गुळ घ्या, गोड गोड बोला

| वर्ष - 7 | अंक - 246 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

संक्रांतीच्या शुभेच्छा!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 15 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ‘तिसरी बार मोदी सरकार, इसबार चारसो पार’; राज्यातील सर्व 48 जागा जिंकण्याचा निर्धार

# महायुतीचा संकल्प मेळावा!

## » लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय आणि मनोमिलन साधण्यासाठी पहिला संयुक्त मेळावा उत्साहात!

। पुणे । महाईन्यूज ।

**‘तिसरी बार मोदी सरकार, इसबार चारसो पार’ असा संकल्प करत आगामी लोकसभा निवडणुकीत पुण्यासह राज्यातील सर्व ४८ जागा जिंकण्याचा निर्धार महायुतीच्या मेळाव्यात रविवारी करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील चारही जागांवर महायुतीचा उमेदवार मोठ्या फरकाने विजयी होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय आणि मनोमिलन साधण्यासाठी भाजप, शिवसेना, अजित पवार गट, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), शिवसंग्राम आणि अन्य मित्रपक्षांचा जिल्ह्याचा पहिला संयुक्त मेळावा रविवारी झाला.**



### पुण्याच्या दोन्ही दादांची महायुतीच्या मेळाव्याकडे पाठ

**» आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित महायुतीच्या मेळाव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पाठ फिरवली. आमदार माधुरी मिसाळ यांची अनुपस्थिती आणि चेतन तुपे यांची अल्प काळासाठीची उपस्थिती चर्चेचा विषय ठरली.**

विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी राज्यमंत्री विजय शिवतरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी राज्यमंत्री दत्तात्रेय भरणे, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे शहराध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहरप्रमुख अजय भोसले आणि प्रमोद भानगिरे, रिपाइंचे शहराध्यक्ष परशुराम वाडेकर यांच्यासह तिन्ही पक्षाचे आमदार उपस्थित होते.

राजकीय विचारधारा काही असली तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींची विकासाची विचारधारा हाच भारताचा धर्म होईल. राजकीय इच्छाशक्ती आणि अपार कष्ट करायची ताकद इतर पक्षातील नेत्यांना भावत आहे. त्यामुळे मेळाव्याच्या निमित्ताने महायुती हाच आपला पक्ष आहे आणि महायुतीमधील तिन्ही पक्षांचे मनोमिलनाचा धागा कायम ठेवावा, असे आवाहन महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केले.



“ आगामी निवडणुकीत बारामतीची जागा पडणार आहे. ती २०१४ ला जाणार होती. मात्र थोडक्यात घोटाळा झाला. या राज्याने दोन वर्षे ‘बसे’ मुख्यमंत्री पाहिले. तेलंगणातही असेच मुख्यमंत्री होते. लोकांनी त्यांना घरी बसविले. लोकांना काम करणारी सेना हवी आहे. अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमावर काँग्रेसने बहिष्कार टाकला आहे. बहिष्कार टाकण्याशिवाय त्यांना दुसरे काही येत नाही. आगामी निवडणुकीत जनता त्यांच्यावर बहिष्कार टाकेल. निवडणुकीला शंभर दिवस राहिले आहेत. त्यामुळे महायुतीतील सर्वांनी एकदिलाने काम केले पाहिजे. कामाचे नीट वाटप करून नव्याने वेळापत्रक तयार करा. पुणे लोकभेसाठी ७५ टक्के मतदान झाले पाहिजे, याद्दष्टीने प्रयत्न करा.

**- प्रकाश जावडेकर**

“ मोदींच्या कार्यशैलीमुळे सर्वजण एकत्र आले आहेत. १९७२ च्या दुष्काळात मिलो खाणारा देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यस्था होत आहे. याचे दुसऱ्या पक्षातून आलेल्यांना आकर्षण आहे. राजकीय विचारधारा काही असली तरी मोदींची विकासाची विचारधारा हाच भारताचा धर्म होईल. राजकीय इच्छाशक्ती आणि अपार कष्ट करायची ताकद इतर पक्षातील नेत्यांना भावत आहे. त्यामुळे विजयाच्या हॅट्रिकमध्ये येण्याचे भाग्य राष्ट्रवादीला मिळाले आहे. उगाच काही न करणारे नेतृत्व आता नाही. एकमेकांविषयीची कटुता दूर करण्याची संधी या मेळाव्यात आली आहे. मोदीशिवाय पर्याय नाही. महायुतीतील पक्षांना काही तरी द्या, अशी मागणी होते. महायुती हाच आपला पक्ष अशी भावना असली पाहिजे.

**-रामराजे निंबाळकर**

# राम मंदिराच्या अन्य भानगडीत पडू नका!

## राज ठाकरेंची कार्यकर्त्यांना तंबी, 'कारसेवकां'साठी चांगले उपक्रम राबवा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येत येत्या २२ जानेवारीला राम मंदिराचा शिलान्यास होणार आहे. राम मंदिराच्या अन्य भानगडीत पडू नका, अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना तंबी दिली. त्याचवेळी मंदिर होण्यासाठी ज्या कारसेवकांनी कष्ट घेतले. स्वप्न पाहिले. ते स्वप्न २२ जानेवारीला पूर्ण होत आहे. त्या कारसेवकांसाठी महाराष्ट्रभर आरत्यांसह जे जे चांगले उपक्रम राबवता येतील ते राबवा, असे आवाहन राज यांनी यावेळी केले.**




राम मंदिराच्या शिलान्यासासंदर्भात कोणतेही चांगले उपक्रम राबविताना नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही राज यांनी कार्यकर्त्यांना केल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जिल्हाध्यक्षांचा मेळावा घेण्यात आला. त्यावेळी राज बोलत होते. व्यासपीठावर बाळा नांदगावकर, अनिल शिदोरे, नितीन सरदेसाई, बाबू वागस्कर, शहराध्यक्ष साईनाथ बाबर, राजू उंबरकर उपस्थित होते.

### गाव, परिसर स्वच्छ ठेवा

'तुम्ही हुशार, प्रामाणिक आहात. लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तुम्ही उत्सुक, इच्छुक आहात. तुम्हाला जास्त सांगण्याची गरज नाही. फक्त गाव स्वच्छ ठेवा, एवढेच मला सांगायचे आहे. आपल्या आजूनबाजूचा परिसर स्वच्छ ठेवायला पैसे लागत नाही. इच्छाशक्ती लागते. जेवढे तुम्ही गाव, परिसर स्वच्छ ठेवाल तेवढे तुम्ही रोगराईमुक्त व्हाल. गावामध्ये छान वाटले पाहिजे. अस्वच्छ वातावरणामुळे तुमचे मनही अस्वच्छ होते. तुम्हाला असेच अस्वच्छ राहते. तुम्हाला जगण्याची उर्मी ही कमी होते,' असे सांगत राज यांनी पदाधिकाऱ्यांना गावे स्वच्छ ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### स्वप्न पाहू नका

'तुम्ही ज्या भागात राहता तेथील प्रश्न तुम्हाला माहिती आहे. ते प्रश्न कसे सोडावयचे हे ही तुम्हाला माहिती आहे. राजकारणाच्या पहिल्या टप्प्यावर तुम्ही पाऊल ठेवले आहे. सध्या सरपंच आहात. उद्या जिल्हा परिषदेचे सदस्य, आमदार, खासदार व्हाल. म्हणजे आतापासून स्वप्न पाहू नका,' अशा शब्दांत राज ठाकरे यांनी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना कानपिचक्या दिल्या.

### पाच लाख देणार

मनसेच्या हाती ग्रामपंचायती असलेल्या गावांमध्ये गाव स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांच्या बैठक घ्या.

मनसेच्या हाती असलेल्या ग्रामपंचायतींपैकी सर्वोत्कृष्ट स्वच्छ गावांमध्ये येऊन मी पाच लाखांचा निधी देईन. कमी वाटले तर जास्त देईन आणि देईनच, अशी घोषणा राज ठाकरे यांनी यावेळी केली. त्यावेळी, 'पुणे शहरासाठी आज ५० हजार कोटी रुपये जाहीर करत आहे,' अशा घोषणा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर राज यांनी टीका केली.

### मनसेचा झेंडा उखाडू शकत नाही

ज्यांनी मतदान केले नसेल त्यांच्यावर सूड उगवू नका. त्यांनाही वाटले पाहिजे आपण यांना मतदान करायला हवे होते. त्यावेळी तुम्हाला त्या भागातून कोणीही हात लावू शळकणार नाही. मनसेचा झेंडा कोमी उखडू शकत नाही, असा विश्वास व्यक्त करायला राज विसरले नाहीत.

### कार्यकर्ते 'उत्साही' अन् 'आजारी' राज

भाषणाच्या सुरुवातीलाच 'मला यायला उशीर झाला, यापेक्षा खरे तर येऊच शकत नव्हतो. काल संध्याकाळपासून मला ताप आल्यासारखे वाटत होते. सकाळी उठल्यानंतर डोळे उघडत नव्हते. आताही अशक्तपणा अंगात आहे. पण तुम्ही इतक्या लांबून आला आहात. तुमचे दर्शन घेतल्याशिवाय मुंबईत परतणार नाही. म्हणून पाच दहा मिनिटे तुमच्याशी बोलायला आलो आहे,' असे सांगत राज यांनी आपण आजारी असल्याचे सांगून टाकले. त्यामुळे कित्येक तास राज यांचे भाषण ऐकण्यासाठी आतूर झालेल्या कार्यकर्त्यांना अवघी काही मिनिटेच आपल्या नेत्याचे शब्द ऐकायला मिळाल्याने कार्यकर्त्यांची निराशा झाली.

# मी लढणार, उभं राहणार आणि निवडूनही येणार

## शिरूर मतदारसंघात माजी खासदार आढळराव पाटलांचे आव्हान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मी लढणार, मी निवडणुकीला उभं राहणार आणि निवडूनही येणार असं म्हणत शिरुर मतदारसंघात (SHIRUR LOK SABHA CONSTITUENCY) आढळराव पाटील (SHIVAJIRAO ADHALARAO PATIL) यांनी आव्हान दिलं आहे. दरम्यान यामुळे अमोल कोल्हेंची डोकेदुखी पुन्हा वाढणार का याकडे लक्ष लागून राहिलंय. राज्याच्या राजकारणात भूकंप झाल्यानंतर मतदारसंघात बऱ्याच कुरघोडी सुरु असल्याचं पाहायला मिळतंय.**

शिरुर मतदारसंघात सध्या राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे आहेत, पण या जागेवर शिंदे गटाकडून आढळराव पाटील इच्छुक असल्याच्या चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरु आहेत. त्यातच आता आढळराव पाटलांनी व्यक्त केलेला हा विश्वास अमोल कोल्हेंना थेट आव्हान तर नाही असा प्रश्न उपस्थित केला जातोय. राज्यभरात 14 जानेवारी रोजी महायुतीकडून मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यावेळी आढळराव पाटलांनी मतदारसंघावर भाष्य केलं. त्यांनी म्हटलं की, तिन्ही पक्ष एकत्र येऊन या जागे संदर्भात निर्णय घेतील. ज्या पक्षाला ही जागा जाईल त्या पक्षासाठी इतर दोन पक्ष





काम करतील. मी लढणार, मी निवडणुकीला उभं राहणार आणि निवडून येणार हे पूर्ण सत्य आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी अजित पवारांकडून या मतदारसंघासाठी दावा करण्यात आला होता. त्यानंतर महायुतीमध्ये पुन्हा एकदा एका मतदारसंघावरुन वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात होती. अमोल कोल्हे यांना आगामी लोकसभा निवडणुकीत पाडणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केल्यापासून शिरूर लोकसभा मतदारसंघ चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे मागच्यावेळी या लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेच्या वतीने शिवाजीराव आढळराव पाटील आणि राष्ट्रवादीकडून अमोल कोल्हे मैदानात होते. मात्र, या दोन्ही पक्षात आता दोन गट निर्माण झाले आहेत. शिवाजीराव आढळराव पाटील शिंदे गटात आणि अमोल कोल्हे शरद पवार गटात आहेत.

महाविकास आघाडीत अमोल कोल्हे यांनाच उमेदवारी मिळणार असल्याचे बोलले जात आहे. परंतु, महायुतीमध्ये एकीकडे शिवाजीराव आढळराव पाटील लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक असून, दुसरीकडे अजित पवारांनी देखील याच मतदारसंघात निवडणूक लढवण्याच म्हटले आहे. मात्र, शिवाजीराव आढळराव पाटील हे शिंदे गटाकडून की अजित पवार गटाकडून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार हे पाहणं महत्वाचे असणार आहे.

### महायुतीकडून मेळाव्यांचे आयोजन

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे आहेत, पण या जागेवर शिंदे गटाकडून आढळराव पाटील इच्छुक असल्याच्या चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरु आहेत. त्यातच आता आढळराव पाटलांनी व्यक्त केलेला हा विश्वास अमोल कोल्हेंना थेट आव्हान तर नाही असा प्रश्न उपस्थित केला जातोय. राज्यभरात 14 जानेवारी रोजी महायुतीकडून मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यावेळी आढळराव पाटलांनी मतदारसंघावर भाष्य केलं.

# आयुक्त शेखर सिंह यांची बदली करा!

## भाजपचे माजी संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

। पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी बाबुगिरीला प्राधान्य दिल्याचा आरोप करत त्यांची त्वरित बदली करण्यात यावी, अशी मागणी भाजपचे माजी संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांनी शासनाकडे केली आहे. अमोल थोरात यांनी याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. त्यात नमूद केले आहे की, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सातत्याने चुकीची कामे करून शहरवासीयांचा रोष ओढवून घेतला आहे.**




1500 कोटींचा टीडीआर घोटाळा तसेच विविध प्रकल्पांच्या निविदा प्रक्रिया देखील संशयास्पद आहेत. मुळात शेखर सिंह हे सातारा येथे कार्यरत असताना तेथे देखील त्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप झाले होते. त्यामुळे त्यांची मुदतपूर्व बदली करून पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदी त्यांची नेमणूक करण्यात आली. आयुक्त म्हणून पदभार स्वीकारण्याबाबत ते उदासीन होते. सुरुवातीचे काही दिवस त्यांनी रजा घेऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरीही काही उपयोग होत नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी दिवस ढकलण्यासाठी महापालिका आयुक्त म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्यातही 'खाबुगिरी'वाल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना हाताशी धरून त्यांनी कामकाज सुरू केले. त्यांच्या नकारात्मकतेमुळे शहरातील सर्वसामान्यांमध्ये सरकार आणि भाजपाबाबत 'कटू' भावना निर्माण होत आहे. सिंह यांनी केवळ 'खाबुगिरी'ला प्राधान्य दिले आहे. अशा 'खाबुगिरी' आणि 'बाबुगिरी'ला आळा बसला पाहिजे. त्यासाठी महापालिका आयुक्त सिंह यांची त्वरित बदली करण्यात यावी,अशी मागणी अमोल थोरात यांनी निवेदनातून केली आहे.

### सिंह यांच्या हेकेखोरपणामुळे लोकोपयोगी प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात अडचणी

» शहराच्या विकासासाठी दूरदृष्टीचे प्रकल्प न आणता केवळ चालढकल म्हणून दिखावा केला. त्यातही या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात आहेत. त्यामुळे त्यावर सत्ताधारी नगरसेवक व भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी आक्षेप घेतला.
असे असतानाही आयुक्त शेखर सिंह यांनी न जुमानता प्रशासकीय हेकेखोरपणा कायम ठेवला. या हेकेखोरपणामुळे लोकोपयोगी प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात अडचणी आल्या. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची कार्यशैली त्यास कारणीभूत आहे. शेखर सिंह यांच्या एकांगीपणामुळे राज्यातील महायुतीचे सरकार तसेच भाजपची प्रतिमा मलीन होत आहे.

---

# सामाजिक एकोप्याचा संदेश देत युवक राष्ट्रवादीचा 'क्षितिज-२०२४' उत्साहात

## पिंपरी-चिंचवडमधील पहिलाच उपक्रम : प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती

। मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पुढाकाराने सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा संदेश देत 'क्षितिज-२०२४' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याला शहरातील ख्रिस्ती बिशप, ज्येष्ठ धर्मगुरू, उद्योजक आणि समाजसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**






चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे 'क्षितिज-२०२४' चे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक पंकज भालेकर, उपाध्यक्ष विशाल काळभोर, सरचिटणीस विशाल काळभोर, कार्याध्यक्ष फझल शेख, युवती अध्यक्षा वर्षा जगताप आदी उपस्थित होते. राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी शहराच्या वतीने प्रथमच शहरातील ख्रिस्ती बिशप, ज्येष्ठ धर्मगुरु, उद्योजक व समाजसेवक यांचा 'नागरी सत्कार' करण्यात आला.या प्रसंगी प्रसिद्ध किर्तनकार आचार्य वसंतराव गायकवाड यांचा सुमधुर किर्तनाचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी युवकचे शहराध्यक्ष शेखर काटे, कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, तुषार ताम्हाने यांनी पुढाकार घेतला. उपाध्यक्ष अभिषेक केळकर, प्रतिश सावतडकर, सरचिटणीस सॅम्युएल मधुरे, संदेश चोपडे, तेजस गवळी, आकाश खरात, सचिव विल्यम यादव, सुमित जगधाने, मेल्विन नागरे, विल्सन यादव, संघटक सॅमसन अँथोनी यांनी आयोजन केले.

### ... या मान्यवर धर्मगुरुंचा केला गौरव

» बिशप रेव्ह. अँड्र्यू राठोड, बिशप रेव्ह जोसेफ हिवाळे, रेव्ह. जोसेफ ढालवाले, पास्टर राजेश केळकर, पास्टर डॅनियल अँथनी, रेव्ह. सुखानंद डोंगरदिवे, पास्टर रमेश साळवी, डॅनियल दळवी, ॲड. प्रसाद सांगळे, ॲड. बाजीराव दळवी, नितीश दुबे, स्नेहल डोंगरदिवे या मान्यवरांना गौरव करण्यात आला. अशा प्रकारे एकूण ६० मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.




याच स्तंभात २८ ऑगस्ट २०२२ रोजी मी लिहिले होते..‘मानवाचे दु:ख बिल्किस बानो नावाच्या अत्याचारित आणि शोकग्रस्त मातेपेक्षा आणखी कोणीही व्यक्त करू शकत नाही. अगदी सोप्या पण हृदय पिळवटून टाकणाऱ्या शब्दांत तिने लाखो गरीब, भेदभावग्रस्त आणि अत्याचारित लोकांच्या मनातली गोष्ट सांगितली आहे की ‘मला माझा भीतीविना जगण्याचा हक्क परत मिळवून द्या.

# कायद्याच्या राज्या'चे हे एकच क्षणचित्र!



बिल्किस बानोच्या बाबतीत काय झालं ते पुन्हा पुन्हा सांगत राहिलं पाहिजे. २००२ मध्ये ट्रेन जाळल्यानंतर गुजरातमध्ये हिंसाचार उसळला होता. २१ वर्षांची बिल्किस बानो तेव्हा विवाहित होती. तिला तीन वर्षांची मुलगी होती आणि ती पुन्हा गर्भवती होती. गोध्रानंतरच्या या हिंसाचारात काही पुरुषांच्या जमावाने तिच्यावर हल्ला केला. तिच्या मुलीसह तिच्या कुटुंबातील सात जणांची हत्या केली आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. या सगळ्यानंतरही ती जिवंत राहिली आणि तिची कहाणी सांगू शकली. तिच्या हल्लेखोरांवर मुंबईतील विशेष न्यायालयात खटला चालला. २१ जानेवारी २००८ रोजी लागलेल्या निकालात ११ जण दोषी ठरले. त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यानंतर १४ वर्षांनी म्हणजे १५ ऑगस्ट २०२२ रोजी, पंतप्रधानांनी त्यांच्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात लोकांना स्त्री शक्तीचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. आणि त्याच दिवशी काही तासांतच, गुजरात सरकारने या ११ जणांना जन्मठेपेची उर्वरित शिक्षा माफ केली आणि त्यांना मुक्त केले. सुटका झालेल्या या ११ दोषींनी त्यांच्या १४ वर्षांपूर्वीच्या गुन्ह्याबद्दल कोणताही खेद व्यक्त केला नाही. त्यांचे पुष्पहार घालून आणि मिठाई देऊन स्वागत करण्यात आले. स्वागत करणाऱ्यांपैकी काहींनी तर चरण स्पर्श करून त्यांच्याबद्दल आदर व्यक्त केला. एक जण तर म्हणाला, ‘ते चांगले संस्कार असलेले ब्राह्मण आहेत.’ या लेखाचा पुढचा भाग न्यायालयांबद्दलचा आहे. ८ जानेवारी २०२४ रोजी एका ऐतिहासिक निकालात, सर्वोच्च न्यायालयाने या आरोपींना दिलेला माफीचा आदेश मागे घेण्यासाठी दाखल केलेल्या याचिकांना परवानगी दिली आणि ११ मुक्त झालेल्या दोषींना शिक्षा भोगण्यासाठी पुन्हा तुरुंगात पाठवण्याचे आदेश दिले. या दोषींनी सुटका कशी करून घेतली हे सांगणे हा या स्तंभाचा हेतू नाही. तर कायद्याचे राज्य तसेच कायदा आणि मानवी हक्क यांच्या परस्परसंबंधातील व्यापक प्रश्नांची चर्चा करणे हा आहे. या प्रकरणाचा तिसरा भाग या देशातील नागरिकांशी संबंधित आहे. बिल्किस बानो प्रकरणाचा धडा म्हणजे नागरिकांची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, गोपनीयता आणि मानवी हक्कांचे हनन होते. आपले कुणीही काहीही वाकडे करू शकणार नाही असे दोषींना वाटते. पण आपल्याकडे आजही निर्भीड पोलीस अधिकारी आणि धाडसी न्यायाधीश आहेत. ते दोषींना शिक्षेपर्यंत पोहोचवतात. शासनयंत्रणेने संबंधित गुन्हेगारांशी संगनमत करून त्यांना मदत केली आणि त्यांची सुटका केली असे होऊ शकते. याचिकाकर्त्यांनी न्यायालयाची फसवणूक केली असे होऊ शकते. न्यायाधीशांकडून गंभीर चूक होऊ शकते. पण प्रत्येक गोष्टीवर कायद्याचे राज्य असते. त्यामुळेच ‘आता मी पुन्हा श्वास घेऊ शकते’ हे बिल्किस बानोचे शब्द कायमचे गुंजत राहतील.आजूबाजूच्या निराशेच्या आणि अंधकारमय वातावरणात हा एकच आशेचा किरण दिसतो आहे. बिल्किस बानोच्या बाबतीत काय झालं ते पुन्हा पुन्हा सांगत राहिलं पाहिजे. २००२ मध्ये ट्रेन जाळल्यानंतर गुजरातमध्ये हिंसाचार उसळला होता. २१ वर्षांची बिल्किस बानो तेव्हा विवाहित होती. तिला तीन वर्षांची मुलगी होती आणि ती पुन्हा गर्भवती होती. गोध्रानंतरच्या या हिंसाचारात काही पुरुषांच्या जमावाने तिच्यावर हल्ला केला. तिच्या मुलीसह तिच्या कुटुंबातील सात जणांची हत्या केली आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. या सगळ्यानंतरही ती जिवंत राहिली आणि तिची कहाणी सांगू शकली. तिच्या हल्लेखोरांवर मुंबईतील विशेष न्यायालयात खटला चालला. २१ जानेवारी २००८ रोजी लागलेल्या निकालात ११ जण दोषी ठरले. त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

## संपादकीय »

### सौंदर्य आणि सातत्य

*‘फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!’.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गार.*

फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!’.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गार. ते ज्या ‘जिंकणाऱ्या’ जर्मनांबद्दल बोलले, त्या जर्मनांमध्ये जिंकण्याची मानसिकता रुजवली फ्रान्झ बेकेनबाउर यांनी. १९६०चा उत्तरार्ध आणि १९७०चे दशक बेकेनबाउर यांच्या जर्मनीने गाजवले. फुटबॉल मेरुमणी ब्राझीलचे पेले अस्ताला गेल्यानंतर आणि योहान क्रायुफ यांच्या नेतृत्वाखाली डच फुटबॉल संघ अफलातून कामगिरी करत असताना, स्वत:चे झळाळते अस्तित्व सादर करत, या मातब्बर मंडळींना काही काळ निस्तेज करण्याची कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली. ब्राझिलियन फुटबॉल रसिकांनी फुटबॉलचे वर्णन ‘जोगो बोनितो’ असे केले आहे.

**संसदेचं हिवाळी अधिवेशन ‘इंडिया’च्या खासदारांच्या निलंबनामुळं गाजलं होतं. राज्यसभेतील ११ खासदारांना निलंबित करून हे प्रकरण हक्कभंग समितीकडं पाठवलं गेल्यामुळं त्यांना आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहभागी होता येईल की नाही हे अजून स्पष्ट झालेलं नाही.**

## खासदारांचं निलंबन मागे?

लोकसभेतील तीन काँग्रेस खासदारांचं निलंबन मागं घेण्याची शिफारस विशेषाधिकार समितीनं केली आहे. त्यामुळं कदाचित राज्यसभेची समितीदेखील लोकसभेचं अनुकरण करेल असं दिसतंय. चार दिवसांपूर्वी उपसभापती हरिवंश यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, पण, अपुऱ्या गणसंख्येमुळं ती रद्द झाली. कदाचित सगळ्याच खासदारांचं निलंबन मागं घेण्याच्या मूडमध्ये असावेत. गेल्या वर्षभरात निलंबित खासदारांची प्रकरणं विशेषाधिकार समितीकडं सोपवली जात होती. काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील, आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांनाही विशेषाधिकार समितीसमोर जावं लागलं होतं. पण, अखेर या खासदारांवर झालेली कारवाई मागे घेण्यात आली. त्यामुळं या खासदारांचंही निलंबन मागं घेतलं जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हिवाळी अधिवेशन



निलंबनापेक्षाही लोकसभेतील तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्या केलेल्या नकलेमुळं गाजलं होतं. हे प्रकरणही आता मिटलेलं आहे. धनखड यांनी बॅनर्जी यांना भोजनाचं निमंत्रण दिलं आहे. कदाचित अर्थसंकल्पीय अधिवेशात दोघांचं मनोमीलन होईल. असं सगळं सामंजस्याचं वातावरण निर्माण होत असेल तर राज्यसभेतील खासदारांनाही माफ करता येऊ शकतं. राज्यांतील नेत्यांचं मन दिल्लीमध्ये रमतं असं नाही. अजित पवार यांच्यासारखे नेते तर दिल्लीत पाऊल टाकायला तयार नसतात. क्वचित कधीतरी आले तरी इथल्या माध्यमांशी ते बोलत नाहीत. काळा चष्मा लावून बाहेर पडतात आणि थेट मुंबई गाठतात. अर्थात असे अजित पवार हे एकटेच नाहीत. दक्षिणेकडील नेतेही तसेच. पाटण्यामध्ये ‘इंडिया’ची बैठक झाली, तेव्हा तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि ‘द्रमुक’चे सर्वेसर्वा एम. के. स्टॅलिन पत्रकार परिषदेला नव्हतेच. तेही कधी दिल्लीत येऊन बोलले असं दिसलेलं नाही. दिल्लीत फारसं न बोलणाऱ्या नेत्यांचा हा एक गट झाला. राज्यांतील नेत्यांचा दुसरा गटही आहे. हे नेते रमतात राज्यामध्येच. ते दिल्लीत येतात, काम झालं की, लगेच आपापल्या गावी निघून जातात. ते फारसे दिल्लीत राहात नाहीत. पण, ते दिल्लीत माध्यमांशी मात्र बोलतात. दिल्लीतील माध्यमांचा वापर आपल्या राज्यातील राजकारणासाठी कसा करायचा हे त्यांना अचूक माहिती असतं. दिल्लीतील माध्यमांना कोणतं खाद्य द्यायचं, त्यावर कसं चर्वण होईल याचा अंदाज या नेत्यांना असतो. या गटातील एक नेते दिल्लीत एका दिवसासाठी आलेले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आम्ही बंड केल्यामुळे भाजप सत्तेत

## » तुम्हाला सत्ता मिळाली असती का : गुलाबराव पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यभर महायुतीचे मेळावे होत असताना त्यांच्या घटक पक्षांनी मात्र भाजपवर नाराजी व्यक्त केल्याच्या घटना घडत आहेत. जळगावमध्ये महायुतीचा कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांच्यासह गुलाबराव पाटलांनी (GULABRAO PATIL) भाजपवर नाराजी व्यक्त केली. आम्ही बंड केल्यामुळंच भाजप सत्तेत आल्याचं राज्याचे मंत्री आणि शिंदे गटाचे नेते गुलाबराव पाटील यांनी म्हटलंय.**

आम्ही बंड केलं नसतं तर तुम्हाला सत्ता मिळाली असती का? असा थेट सवाल गुलाबराव पाटलांनी भाजपला विचारला. तसेच राम मंदिर कुणाची खासगी प्रॉपर्टी नाही असंही ते म्हणाले. राज्यात महायुतीचे सरकार असताना या महायुतीमध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टीने आज जळगावमध्ये कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गुलाबराव पाटील म्हणाले की, "तुमच्या वेळेस बरोबर होते आणि आमच्या वेळेला गडबड होत असल्याचा आरोप केला आहे. शिवसेनेत असताना आम्ही भाजपा सोबत गेलो त्यावेळी वर्षभर आम्हाला आणि आमच्या कुटुंबाला काय त्रास सहन करावा लागला हे आमच्या कुटुंबाला माहीत. आमचं काय होईल हे माहीत नसताना आम्ही धोका पत्करून आपल्यासोबत आलो आहोत याची जाणीव ठेवायला हवी." राम मंदिर सोहळा प्रश्नांवरही मंत्री गुलाबराव पाटील यांनी नाराजीचा सूर लगावला. ते म्हणाले की, मागील काळात मशीद पडली त्यावेळी आपणही त्यामध्ये सहभागी होतो. आपल्याला जेलमध्ये जावे लागले होते. राम सर्वांचा आहे, रामाला प्रायव्हेट कंपनी करू नका. आगामी काळात निवडणुका डोळ्या समोर असल्याचं पाहता आता महा युती



मधील तिन्ही पक्षातील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी समन्वय साधून निवडणुकात सहभागी झाले तर यश नक्की मिळणार आहे. केवळ लोकसभा आणि विधानसभाच नव्हे तर सर्वच निवडणुकीत एकीने लढायला हवे अशी अपेक्षा ही गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली आहे. शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनीही भाजपवर नाराजी व्यक्त करताना म्हटलं की, गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना भाजपा युती आहे. मात्र शिवसेनेनं कधीही गद्दारी केलेली नाही. मात्र माझ्या उमेदवारीच्या वेळेस एका अपक्ष उमेदवाराला पुढे करण्यात आले. एवढंच काय तर नंतर त्याला भाजप तालुका अध्यक्ष बनवण्यात आले. बाजार समिती निवडणुकीमध्येही भाजपाने युतीधर्म निभावला पाहिजे होता, मात्र त्यावेळीही त्यांनी साथ दिली नाही. भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर शिंदे गटाचे मंत्री गुलाबराव पाटील आणि आमदार किशोर पाटील यांनी व्यक्त केलेली नाराजी पाहता महायुतीमध्ये वरवर आलबेल दिसत असले तरी आत मात्र धुसफुस सुरू असल्याचं पाहायला मिळतंय. गुलाबराव पाटील म्हणाले की, "तुमच्या वेळेस बरोबर होते आणि आमच्या वेळेला गडबड होत असल्याचा आरोप केला आहे. शिवसेनेत असताना आम्ही भाजपा सोबत गेलो त्यावेळी वर्षभर आम्हाला आणि आमच्या कुटुंबाला काय त्रास सहन करावा लागला हे आमच्या कुटुंबाला माहीत. आमचं काय होईल हे माहीत नसताना आम्ही धोका पत्करून आपल्यासोबत आलो आहोत याची जाणीव ठेवायला हवी." राम मंदिर सोहळा प्रश्नांवरही मंत्री गुलाबराव पाटील यांनी नाराजीचा सूर लगावला. ते म्हणाले की, मागील काळात मशीद पडली त्यावेळी आपणही त्यामध्ये सहभागी होतो. आपल्याला जेलमध्ये जावे लागले होते. राम सर्वांचा आहे, रामाला प्रायव्हेट कंपनी करू नका.राज्यभर महायुतीचे मेळावे होत असताना त्यांच्या घटक पक्षांनी मात्र भाजपवर नाराजी व्यक्त केल्याच्या घटना घडत आहेत. जळगावमध्ये महायुतीचा कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला.

### मागील काळात मशीद पडली

» ला सत्ता मिळाली असती का? असा थेट सवाल गुलाबराव पाटलांनी भाजपला विचारला. तसेच राम मंदिर कुणाची खासगी प्रॉपर्टी नाही असंही ते म्हणाले. राज्यात महायुतीचे सरकार असताना या महायुतीमध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टीने आज जळगावमध्ये कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गुलाबराव पाटील म्हणाले की, "तुमच्या वेळेस बरोबर होते आणि आमच्या वेळेला गडबड होत असल्याचा आरोप केला आहे. शिवसेनेत असताना आम्ही भाजपा सोबत गेलो त्यावेळी वर्षभर आम्हाला आणि आमच्या कुटुंबाला काय त्रास सहन करावा लागला हे आमच्या कुटुंबाला माहीत. आमचं काय होईल हे माहीत नसताना आम्ही धोका पत्करून आपल्यासोबत आलो आहोत याची जाणीव ठेवायला हवी." राम मंदिर सोहळा प्रश्नांवरही मंत्री गुलाबराव पाटील यांनी नाराजीचा सूर लगावला. ते म्हणाले की, मागील काळात मशीद पडली त्यावेळी आपणही त्यामध्ये सहभागी होतो. आपल्याला जेलमध्ये जावे लागले होते. राम सर्वांचा आहे, रामाला प्रायव्हेट कंपनी करू नका. आगामी काळात निवडणुका डोळ्या समोर असल्याचं पाहता आता महा युती मधील तिन्ही पक्षातील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी समन्वय साधून निवडणुकात सहभागी झाले.

# लोकसभेनंतर बघू, पण तोपर्यंत तरी गोड बोला

## » सांगलीतल्या महायुतीच्या मेळाव्यात पडळकरांचं वक्तव्य

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोकसभेनंतर बघू, पण तोपर्यंत तरी गोड बोला, त्यानंतर करेक्ट कार्यक्रम करावे लागणार आहेत. असं म्हणत सांगलीतल्या महायुतीच्या मेळाव्यात (MAHAYUTI MELAVA) लोकसभा निवडणुकांवर (LOKSABHA ELECTION) गोपीचंद पडळकरांनी (GOPICHAND PADALKAR) भाष्य केलं. सांगलीत महायुतीच्या मेळाव्यांचं आयोजन करण्यात आलं होतं.**

लोकसभेची उमेदवारी हवी असेल तर आधीच मागा, ज्यावेळी कमळाचे चिन्ह जाहीर होईल त्याच्यामागे आपली ताकद उभी करा, असं वक्तव्य गोपीचंद पडळकर यांनी त्यांच्या भाषणादरम्यान केलं. या मेळाव्याला जिल्ह्यातील भाजप खासदार संजय काका पाटील, शिंदे गटाचे आमदार अनिल बाबर, अजित पवार गटाचे नेते, आमदार, माजी आमदार सदाभाऊ खोत, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविवार 14 जानेवारी रोजी संपूर्ण राज्यभरात महायुतीच्या मेळाव्यांचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी सांगलीत देखील हा मेळावा आयोजित करण्यात



आला होता. वैचारिक मतभेद असू शकतात पण प्रत्येकाला इच्छा असते ती खासदारकीची. प्रत्येकाने मत, इच्छा व्यक्त करा. पण लोकसभेच्या आधी ज्यांना ज्यांना तिकीट मागायचं त्यांनी मागा. ज्यावेळी कमळाचं जाहीर होईल, त्याच्या मागे आपली ताकद उभी करा, असंही पडळकरांनी म्हटलं आहे. या कार्यक्रमला माजी आमदार सदाभाऊ खोत देखील उपस्थित होते. यावेळी त्यांनी म्हटलं की, आम्ही काय बँडवाले आहोत का? लग्न ठरल्यावरच वाजंत्र्याची आठवण कशी आली? निवडणुका जवळ आल्यावरच भाजपला मित्रपक्षांची आठवण होते असं म्हणत माजी आमदार सदाभाऊ खोत यांनी भाजपवर चांगलीच टीका केली आहे. सगळ्यांना खऱ्या अर्थानं तुम्हाला बरोबर घेऊन जावे लागेल कारण नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करायचं आहे. भाजप आणि सेना हे मोठे पक्ष आहेत. छोटे घटक बाजूला गेले नाहीत. त्यावेळी विरोधक सत्तेत होते. त्यावेळी आम्ही त्याच्या विरोधात आंदोलन करत होतो.

### करेक्ट कार्यक्रम करावे लागणार

» मुंबईच्या मिटिंगमध्ये सांगितले आता तुम्ही कामाला लागा. पण हा लग्नाचा सीजन आहे का? का आम्ही बँडवाले आहे का? वेळ आली की वाजवायला यायचे. असे करू नका, आम्हालाही सन्मान द्या.लोकसभेनंतर बघू, पण तोपर्यंत तरी गोड बोला, त्यानंतर करेक्ट कार्यक्रम करावे लागणार आहेत. असं म्हणत सांगलीतल्या महायुतीच्या मेळाव्यात (Mahayuti Melava) लोकसभा निवडणुकांवर गोपीचंद पडळकरांनी (Gopichand Padalkar) भाष्य केलं.

# आधी स्वत:च्या नेत्यांना न्याय द्या

## देवरांच्या राजीनाम्यानंतर भाजपाची राहुल गांधींवर टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेसचे नेते मिलिंद देवरा यांनी लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यानंतर ते शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. देवरा यांनी काँग्रेसला राम राम ठोकल्यानंतर भाजपाकडून काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधण्यात आला आहे. भाजपाच्या आयटी विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्सवर पोस्ट टाकून राहुल गांधी यांना टोला लगावला. ते म्हणाले, “न्याय यात्रा काढण्याऐवजी आधी स्वपक्षातील नेत्यांना न्याय द्या.”**

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील आजपासून भारत जोडो न्याय यात्रा हिंसाचारग्रस्त मणिपूरमधून सुरू होत आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक न्याय हे मुद्दे यात्रेच्या माध्यमातून उपस्थित केले जाणार आहेत. यात्रा पूर्व ते पश्चिम दिशेने १५ राज्यांमधून जाईल आणि मुंबईमध्ये समाप्त होईल. आज सकाळी काँग्रेस नेते विमानाने दिल्लीहून मणिपूरला रवाना झाले. यावेळी विमानात बसलेल्या काँग्रेस नेत्यांचा घोषणाबाजी देतानाचा एक व्हिडिओ काँग्रेसने एक्सवर टाकला होता. या व्हिडिओमध्ये राहुल गांधींसह अनेक काँग्रेसनेते बसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान अमित मालवीय यांच्यासह भाजपाचे आमदार अतुल भातखळकर यांनीही काँग्रेसला लक्ष्य केले. “कांग्रेसमध्ये “राम” उरलेला नाही, हे मिलिंद देवरांच्या उशीरा का होईना लक्षात आले आहे”, अशी पोस्ट त्यांनी एक्सवर टाकून काँग्रेसला टोला लगावला आहे. दरम्यान दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळणार नाही, हे जवळपास स्पष्ट झाल्याने मिलिंद देवरा यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला. आपल्या कुटुंबाचे काँग्रेस पक्षाबरोबर असलेले ५५ वर्षांचे नाते मी संपवत आहे, अशी पोस्ट मिलिंद देवरा यांनी एक्सवर केली आहे. आपल्या पोस्टमध्ये



मिलिंद देवरा म्हणाले, “आज माझ्या राजकीय प्रवासातील एका महत्त्वाच्या प्रकरणाचा शेवट करत आहे. मी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यपदाचा राजीनामा देत आहे. काँग्रेसशी माझ्या कुटुंबाचे ५५ वर्षांपासूनचे संबंध आज संपवत आहे. इतके वर्ष मला पाठिंबा दिल्याबद्दल काँग्रेसमधील नेते, सहकारी आणि कार्यकर्त्यांचा मी आभारी आहे.” काँग्रेसचे माजी खासदार मिलिंद देवरा यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. ते शिंदे गटात प्रवेश करण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर देवरा यांचा शिंदे गटात पक्षप्रवेश होऊ शकतो. देवरांच्या राजीनाम्यावर काँग्रेसची प्रतिक्रिया समोर आली आहे. काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी ‘एक्स’ अकाउंटवर एक ट्वीट करत दिवंगत नेते मुरली देवरा यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. “मुरली देवरा यांच्याबरोबरचे दिवस मला आठवतात. मुरली देवरा यांचे सर्वच पक्षांमध्ये मित्र होते. पण, ते नेहमीच काँग्रेसच्या पाठीशी उभे राहिले. तथास्तु!”, अशी प्रतिक्रिया जयराम रमेश यांनी मिलिंद देवरांच्या राजीनाम्यावर दिली आहे. ‘एक्स’ अकाउंटवर ट्वीट करत मिलिंद देवरांनी म्हटलं, “आज माझ्या राजकीय प्रवासातील एक महत्त्वाच्या अध्यायाचा समारोप होत आहे. काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा मी राजीनामा दिला आहे. त्याचबरोबर माझ्या कुटुंबाचे पक्षाशी ५५ वर्षांचे नाते मी संपवत आहे. सर्व नेते, सहकारी आणि कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे दिलेल्या पाठिंब्याबाबत मी त्यांचे आभारी मानतो.” मिलिंद देवरा यांनी लोकसभेत दोनवेळा दक्षिण मुंबई मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं आहे. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात देवरा यांनी राज्यमंत्री म्हणून काम केलं आहे. अशातच मिलिंद देवरा पुन्हा दक्षिण मुंबईतून लोकसभा निवडणूक लढवण्यास उत्सुक आहेत. पण, दक्षिण मुंबई मतदारसंघावर शिवसेना ठाकरे गटानं दावा सांगितलं आहे. ठाकरे गटाचे विद्यमान खासदार अरविंद सावंत मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे हा मतदारसंघ काँग्रेसला मिळणार नसल्याचं नक्की झालं होतं. त्यामुळे देवरा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करतील, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती.राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील आजपासून भारत जोडो न्याय यात्रा महागाई आणि सामाजिक न्याय हे मुद्दे यात्रेच्या माध्यमातून उपस्थित केले जाणार आहेत.

### शिंदे गटात प्रवेश करण्याची शक्यता

“आज माझ्या राजकीय प्रवासातील एका महत्त्वाच्या प्रकरणाचा शेवट करत आहे. मी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यपदाचा राजीनामा देत आहे. काँग्रेसशी माझ्या कुटुंबाचे ५५ वर्षांपासूनचे संबंध आज संपवत आहे. इतके वर्ष मला पाठिंबा दिल्याबद्दल काँग्रेसमधील नेते, सहकारी आणि कार्यकर्त्यांचा मी आभारी आहे.ते शिंदे गटात प्रवेश करण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर देवरा यांचा शिंदे गटात पक्षप्रवेश होऊ शकतो.

# मालदीवने चीनपुढे पसरले हात!

## कर्ज परतफेडी बदलण्यास सहमती दर्शविली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू (MOHAMMED MUIZZU) हे पाच दिवसांच्या चीन दौऱ्यानंतर नुकतेच मायदेशी परतले आहेत. चीनमध्ये गेल्यानंतर त्यांनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग (XI JINPING) यांच्यासोबत सुमारे 20 करार केले. या करारांमध्ये पर्यटन सहकार्य, आपत्ती जोखीम कमी करणे, सागरी अर्थव्यवस्था, डिजिटल अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक मजबूत करणे आणि बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह यांचा समावेश आहे.**




या सगळ्या दरम्यान मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांनी शनिवार 13 जानेवारी रोजी सांगितले की चीनने कर्ज परतफेडीचा कालावधी बदलण्यास सहमती दर्शविली आहे. याबाबत दोन्ही देशांची सरकार लवकरच बोलणी सुरू करणार आहेत. पाच दिवसांच्या चीन दौऱ्यावरून परतल्यानंतर राष्ट्रपती मोहम्मद मुइझ्झू यांनी सांगितले की, त्यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांना मालदीवला दिलेल्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी बदलण्यासाठी किंवा हप्ता वाढविण्याचे आवाहन केले आहे.मालदीव न्यूज पोर्टल सन ऑनलाइनच्या वृत्तानुसार, मुइझ्झू म्हणाले की, चीनच्या अर्थ मंत्रालयाची एक तांत्रिक टीम लवकरच मालदीवला भेट देणार आहे. यानंतर, ही टीम पुढील पाच वर्षांत कर्ज परतफेडीसाठी वाढीव कालावधी देण्याचा मार्ग तयार करेल. चीनकडून घेतलेल्या कर्जावर मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू म्हणाले की, चीनने कर्ज परतफेडीचा कालावधी बदलण्यास सहमती दर्शवली आहे. यामुळे आम्हाला कर्जाची परतफेड करणे अधिक सोपे होईल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या आकडेवारीनुसार, चीन सध्या मालदीवचा सर्वात मोठा बाह्य कर्जदाता आहे, जो त्याच्या एकूण सार्वजनिक कर्जाच्या सुमारे 20 टक्के आहे. याशिवाय ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशनने जारी केलेल्या अहवालानुसार मालदीवने एकूण कर्जापैकी 60 टक्के कर्ज चीनकडून घेतले आहे. कर्ज देणाऱ्या बँकांमध्ये चायना डेव्हलपमेंट बँक, इंडस्ट्रियल अँड कमर्शियल बँक ऑफ चायना आणि एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँक ऑफ चायना यांचा समावेश होतो.

# हे कॉर्पोरेट गांधी, पण मी कस्तुरबा नाही

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

काही दिवसांपूर्वी इन्फोसिसचे संस्थापक (INFOSYS CO-FOUNDER) नारायण मूर्ती (NARAYAN MURTHY) यांचं एक वक्तव्य चर्चेत आलेलं. नारायण मूर्ती यांनी एका मुलाखतीत बोलताना देशातील तरुणांना आठवड्यातून 70 तास काम करण्याचा सल्ला दिलेला. नारायण मूर्तींच्या वक्तव्यानंतर अनेक प्रतिक्रिया समोर आल्या. काहींनी त्यांच्या वक्तव्याचं समर्थन केलं, तर काहींनी त्यांच्या वक्तव्याची खिल्ली उडवली. अशातच आता नारायण मूर्ती यांच्या आठवड्यातून 70 तास काम करण्याच्या वक्तव्याचं समर्थनार्थ त्यांच्या पती सुधा मूर्ती (SUDHA MURTHY) उभ्या राहिल्या आहेत. आजही मी 70 तासांपेक्षा जास्त काम करते, असं म्हणत सुधा मूर्तींनी नारायण मूर्ती यांच्या वक्तव्याचं समर्थन केलं आहे. तसेच, कुटुंबासोबत क्वांटिटी टाईमपेक्षा, क्वॉलिटी टाईम घालवणं अत्यंत गरजेचं आहे, असं नारायण मूर्ती म्हणाले. नारायण मूर्ती आणि सुधा मूर्ती (NARAYAN-SUDHA MURTHY RELATIONSHIP) यांच्यातील नात्याबाबत विचारण्यात आलं. त्यावर सुधा मूर्ती यांनी एक उदाहरण दिलं, त्या म्हणाल्या की, "हे कॉर्पोरेटचे गांधी आहेत. पण मी, कस्तुरबा नाहीय." पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, "1974 मध्ये जेव्हापासून नारायण मूर्ती त्यांना पहिल्यांदा भेटले, तेव्हापासून त्या त्यांना मूर्ती म्हणूनच हाक मारतात."

# रिंकू राजगुरू व आकाश ठोसरच्या फोटोंमुळे चर्चांना उधाण

नागराज मंजुळे दिग्दर्शित ‘सैराट’ या चित्रपटातून रिंकू राजगुरु आणि आकाश ठोसर हे दोन नवे चेहरे प्रेक्षकांच्या भेटीला आले. २९ एप्रिल २०१६ रोजी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचा ‘सैराट’ चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला संपूर्ण महाराष्ट्राने अक्षरश: डोक्यावर घेतलं होतं. यामध्ये रिंकूने आर्ची, तर आकाशने परश्या ही भूमिका साकारली होती. ‘सैराट’पासून यांची जोडी घराघरांत लोकप्रिय झाली. चित्रपट प्रदर्शित होऊन बरीच वर्षे उलटून गेली तरी आजही रिंकू-आकाशला एकत्र पाहून प्रेक्षकांना ‘सैराट’ चित्रपटाची आठवण येते. यामध्ये आर्ची-परश्याची अनोखी व हृदयस्पर्शी प्रेमकहाणी पाहायला मिळाली होती. त्यामुळे सोशल मीडियावर या जोडीला एकत्र पाहिल्यावर दोघांचे चाहते त्यांच्या फोटो व व्हिडीओजवर कमेंट्सचा पाऊस पाडतात. सध्या रिंकू-आकाशने शेअर केलेले असेच काही फोटो सोशल मीडियावर चर्चेत आले आहेत. रिंकू व आकाशने नुकतीच एकत्र आयरा खान आणि नुपूर शिखरेच्या रिसेप्शन पार्टीला हजेरी लावली होती.



यावेळी आकाशने काळ्या रंगाची शेरवानी परिधान केली होती, तर रिंकूने जांभळ्या रंगाची साडी नेसली होती. दोघांच्या लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. या सोहळ्यातील काही फोटो दोघांनी सोशल मीडियावर शेअर केले आहेत. रिंकू-आकाशने शेअर केलेल्या फोटोंवर नेटकऱ्यांनी “आता लवकर लग्न करा”, “अर्ची परश्या तुमची जोडी एक नंबर आहे. भाऊ आता लवकर उरकून टाका”, “तारीख काय ठरली मग लग्नाची” अशा असंख्य कमेंट्स केल्या आहेत. त्यामुळे या लोकप्रिय ऑनस्क्रीन जोडीचे ऑफस्क्रीन फोटो पाहून सध्या सोशल मीडियावर चर्चांना उधाण आल्याचं पाहायला मिळत आहे. परंतु, रिंकू-आकाशने अद्याप या कमेंट्सवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. काही दिवसांपूर्वी एका चाहत्याला ‘आस्क मी सेशन’मध्ये उत्तर देताना रिंकूने ती सिंगल असल्याचं सांगितलं होतं. नागराज मंजुळे दिग्दर्शित ‘सैराट’ या चित्रपटातून रिंकू राजगुरु आणि आकाश ठोसर हे दोन नवे चेहरे प्रेक्षकांच्या भेटीला आले. २९ एप्रिल २०१६ रोजी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचा ‘सैराट’ चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला संपूर्ण महाराष्ट्राने अक्षरश: डोक्यावर घेतलं होतं. यामध्ये रिंकूने आर्ची, तर आकाशने परश्या ही भूमिका साकारली होती. ‘सैराट’पासून यांची जोडी घराघरांत लोकप्रिय झाली. चित्रपट प्रदर्शित होऊन बरीच वर्षे उलटून गेली तरी आजही रिंकू-आकाशला एकत्र पाहून प्रेक्षकांना ‘सैराट’ चित्रपटाची आठवण येते.

## आमिरच्या पार्टीत 3 खान आले एकत्र

आमिर खान व रीना दत्ता यांची लेक आयरा खान नुपूर शिखरेबरोबर नुकतीच लग्नबंधनात अडकली. ३ जानेवारीला नोंदणी पद्धतीने आणि १० जानेवारीला ख्रिश्चन पद्धतीने दोघांचं लग्न झालं. उदयपूरमध्ये आयरा-नुपूरचा शाही लग्नसोहळा झाला. त्यानंतर काल, १३ जानेवारीला मुंबईत आमिरच्या लेकीच्या लग्नाची ग्रँड रिसेप्शन पार्टी झाली. या पार्टीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंपासून ते बॉलीवूडचे दिग्गज सेलिब्रिटी उपस्थित होते. यावेळी अनेक वर्षांनंतर बॉलीवूडचे ३ खान एकत्र पाहायला मिळाले. एक काळ असा होता, ज्यावेळी शाहरुख खान व आमिर खानमधील तणावाचे वृत्त सतत येत असे. ९०च्या दशकपासून या दोघांमध्ये तीव्र स्पर्धा असायची. शाहरुख व आमिरचे अनेक किस्से प्रसिद्ध आहेत. पण आता वेळ आणि काळही बदलला आहे.

## सिक्युरिटीनं दरवाजे उघडले नाहीत

अभिनेत्री राधिका आपटेचा (RADHIKA APTE) 'मेरी ख्रिसमस' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटामुळे सध्या राधिका चर्चेत आहे. राधिका ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करते. राधिकानं नुकताच एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टमध्ये राधिकानं तिला विमानतळावर आलेल्या अनुभवाबद्दल नेटकऱ्यांना सांगून संताप व्यक्त केला आहे. तिच्या या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. राधिका आपटेनं विमानतळाच्या एयरोब्रिजमधील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये राधिका मास्क लावून बसलेली दिसत आहे. या फोटोला राधिकानं कॅप्शन दिलं, "मला हे पोस्ट करावे लागले! आज सकाळी साडेआठ वाजता माझी फ्लाइट होती. आता 10:50 वाजले आहेत आणि फ्लाइट अजूनही बोर्ड झालेली नाही. पण तिथल्या लोकांनी सांगितले की आम्ही बोर्डिंग करत आहोत आणि त्यांनी सर्व प्रवाशांना एयरोब्रिजमध्ये बसवले आणि लॉक केले! लहान बाळे, वृद्धांसह इतर प्रवासी तासाभरापासून कोंडून आहेत. सिक्युरिटीनं दरवाजे उघडले नाहीत. कर्मचाऱ्यांना या गोष्टीची काहीच माहिती नाही! त्यांचा क्रू बोर्ड नव्हता झाला.



## जया बच्चन यांनी पुन्हा पापाराझींना फटकारले

भिनेता आमिर खानची लेक आयरा खान (IRA KHAN) आणि नुपूर शिखरे (NUPUR SHIKHARE) यांचे उदयपूरमध्ये ग्रँड वेडिंग झाले. आमिर आणि नुपूर यांनी ख्रिश्चन पद्धतीनं लग्न केलं. त्यानंतर काल( 13 जानेवारी) मुंबईत आयरा-नुपूरची रिसेप्शन पार्टी आयोजित करण्यात आली होती. या ग्रँड रिसेप्शनला बॉलिवूडपासून ते राजकीय जगतातील अनेक दिग्गजांनी हजेरी लावली. या रिसेप्शन पार्टीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामधील एका व्हिडीओमध्ये जया बच्चन (JAYA BACHCHAN) या पापाराझीवर भडकलेल्या दिसत आहेत. आयरा खान आणि नुपूर शिखरे यांच्या रिसेप्शन सोहळ्यातील सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये जया बच्चन, श्वेता बच्चन आणि सोनाली बेंद्रे या पापाराझीसमोर फोटोसाठी पोज देताना दिसल्या. यावेळी जया बच्चन पापाराझीवर भडकलेल्या दिसल्या. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे की, जया बच्चन या पापाराझीला म्हणतात, "क्या आप इधर अँगल हमको सिखा रहे हैं?" त्यानंतर त्या फोटोग्राफर्सकडे बघून स्माईल करतात. आयराच्या रिसेप्शन सोहळ्यात अनेक बॉलिवूड स्टार्सनं हजेरी लावली. सलमान खाननं देखील हा सोहळ्याला हजेरी लावून आयरा आणि नुपूर यांना शुभेच्छा दिल्या. तसेच शाहरुख खानही पत्नी गौरी खानसोबत पार्टीत पोहोचला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज ठाकरे आणि मुकेश अंबानी यांनी देखील रिसेप्शनला हजेरी लावून नुपूर आणि आयरा या जोडप्याला आशीर्वाद दिले.

## नुपूर शिखरेची आयरा खानसाठी रोमँटिक पोस्ट

आमिर खानच्या लेकीच्या लग्नाची गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चा सुरू आहे. आयरा खान व नुपूर शिखरेचं मुंबईत ३ जानेवारीला नोंदणी पद्धतीने लग्न झालं. या सोहळ्याला त्यांचे कुटुंबीय व जवळचे मित्रमंडळी उपस्थित होते. मुंबईत नोंदणी पद्धतीने लग्न केल्यावर १० जानेवारी रोजी आयरा-नुपूर राजस्थानमधील उदयपूरमध्ये ख्रिश्चन पद्धतीने विवाहबंधनात अडकले. त्यानंतर या जोडप्याने बॉलीवूड सेलिब्रिटींसाठी मुंबईत नुकतंच रिसेप्शन पार्टीचं आयोजन केलं होतं. या रिसेप्शन पार्टीत दिग्गज अभिनेते धर्मेंद्र, रेखा, हेमा मालिनी, जॅकी श्रॉफ, मुमताज, सायरा बानो, जया बच्चन, शाहरुख खान, सलमान खान यांसह अनेक बॉलीवूड कलाकारांनी हजेरी लावली होती. याशिवाय आमिरच्या लेकीच्या रिसेप्शनला काही राजकीय नेते देखील उपस्थित होते. या शाही विवाहसोहळ्यानंतर आयराचा पती नुपूर शिखरेने आयरासाठी खास रोमँटिक पोस्ट शेअर करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. नुपूर शिखरेने रिसेप्शन पार्टीतील आयराबरोबरचे काही खास फोटो शेअर करत त्याला “मला तुझ्याबरोबर खूप वेळा लग्न करायचंय बब्स” असं रोमँटिक कॅप्शन त्याने दिलं आहे. नुपूर शिखरेच्या पोस्टवर त्यांच्या चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. दरम्यान, आयरा खान व नुपूर शिखरे २०२० पासून रिलेशनशिपमध्ये आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांनी गुपचूप साखरपुडा उरकत चाहत्यांना सुखद धक्का दिला होता. यानंतर आता आयरा-नुपूर लग्नबंधनात अडकले.



# इंडिया मालिका जिंकण्यात 'यशस्वी'!

## शिवम-जैस्वालने झळकावली वादळी अर्धशतकं

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना इंदूरच्या होळकर स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात भारताने अफगाणिस्तानवर सहा विकेट्सनी मात करत मालिकेत २-० ने अशी विजयी आघाडी घेतली. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानचा संघ प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १७२ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात भारताने शिवम-यशस्वी यांच्या अर्धशतकाच्या जोरावर १४.४ षटकांत ४ विकेट गमावत १७३ धावा करून सामना जिंकला.**






टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात १५० सामने खेळणारा रोहित शर्मा हा जगातील पहिला पुरुष क्रिकेटपटू ठरला आहे. आतापर्यंत कोणत्याही क्रिकेटपटूला हे स्थान मिळवता आले नाही. अशा परिस्थितीत रोहितने टी-२० क्रिकेटमध्ये इतिहास रचला. रोहितच्या कारकिर्दीतील नवीन कामगिरी पाहून त्याचे चाहते आनंदी झाले. या विक्रमासाठी कर्णधारावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे. रोहितनंतर टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक सामने खेळण्याच्या बाबतीत आयरिश फलंदाज पॉल स्टर्लिंगचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे. पॉलने १३४ सामने खेळले आहेत. त्याच्यानंतर आयरिश खेळाडू जॉर्ज डॉकरेल आहे. जॉर्जने १२८ सामने खेळले आहेत.त्याचबरोबर पाकिस्तानचा फलंदाज शोएब मलिक चौथ्या स्थानावर आहे. शोएबने १२४ सामने खेळले आहेत. न्यूझीलंडचा खेळाडू मार्टिन गप्टिल पाचव्या क्रमांकावर आहे. गप्टिलने १२२ सामने खेळले आहेत. विराट कोहलीबद्दल बोलायचे झाले तर तो या यादीत १०व्या स्थानावर आहे. कोहली आपला ११६ वा सामना खेळत आहे. जर महिला क्रिकेटबद्दल बोलायचे, तर टीम इंडियाची कर्णधार हरमनप्रीत कौरचे नाव सर्वात वर आहे. हरमनने १६१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. न्यूझीलंडची सुझी बेट्स दुसऱ्या स्थानावर आहे. बेट्सने १५२ सामने खेळले आहेत. इंग्लंडची डॅनियल व्याट १५१ सामन्यांसह तिसऱ्या स्थानावर आहे आणि ऑस्ट्रेलियाची एलिस पेरी १५० सामन्यांसह चौथ्या स्थानावर आहे. रोहितच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर, आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वाधिक धावा करणारा तो जगातील दुसरा खेळाडू आहे. रोहितने आतापर्यंत १४९ सामन्यात ३८५३ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये ४ शतके आणि २९ अर्धशतकांचा समावेश आहे. या यादीत विराट कोहलीचे नाव आघाडीवर आहे. ज्याने ११५ सामन्यात ४००८ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये एक शतक आणि २७ अर्धशतकांचा समावेश आहे. भारताने दुसरा T20 सामना जिंकला आहे. भारताने 173 धावांचे लक्ष्य 15.4 षटकात 4 गडी गमावून पूर्ण केले. शिवम दुबेने 32 चेंडूत 63 धावांची नाबाद खेळी केली. जैस्वालने 34 चेंडूत 68 धावांची शानदार खेळी केली. तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने 2-0 अशी आघाडी घेतली आहे. तत्पूर्वी, अर्शदीप सिंगने तीन, अक्षर आणि रवी बिश्नोईने प्रत्येकी दोन बळी घेत अफगाणिस्तानला 172 धावांत रोखले. भारताकडून यशस्वी जैस्वालने ३४ चेंडूत सर्वाधिक ६८ धावा केल्या. या युवा सलामीवीराने आपल्या खेळीत ५ चौकार आणि ६ षटकार मारले. शिवम दुबेने ३२ चेंडूत नाबा ६३ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ५ चौकार आणि ४ षटकार मारले. विराट कोहलीने १६ चेंडूत २९ धावांची आकर्षक खेळी खेळली. मात्र, याशिवाय भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्मा यांना भोपळाही फोडता आला नाही. रिंकू सिंग ९ धावांवर नाबाद राहिला. अफगाणिस्तानसाठी करीम जानतने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय फजुल्ला फारुकी आणि नवीन उल हक यांना प्रत्येकी १ यश मिळाले. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानने २० षटकांत १७२ धावा केल्या. अफगाणिस्तानसाठी अष्टपैलू गुलबदिन नायबने ३५ चेंडूत सर्वाधिक ५७ धावा केल्या. त्याने आपल्या झंझावाती खेळीत ५ चौकार आणि ४ षटकार मारले. भारतासाठी अर्शदीप सिंग हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. अर्शदीप सिंगने ४ षटकात ३२ धावा देत ३ फलंदाजांना बाद केले.

### भानवालानेही कोटा मिळवला

शिवम दुबेने एक विकेट आपल्या नावावर केली.पण अक्षर पटेलने अवघ्या १७ धावां दिल्या शिवम दुबेने एक विकेट आपल्या नावावर केली. या सामन्यात अक्षर पटेल सामनावीर ठरला. मालिकेतील तिसरा सामना १७ जानेवारीला बंगळुत खेळला जाईल. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात १५० सामने खेळणारा रोहित शर्मा हा जगातील पहिला पुरुष क्रिकेटपटू ठरला आहे. आतापर्यंत कोणत्याही क्रिकेटपटूला हे स्थान मिळवता आले नाही. अशा परिस्थितीत रोहितने टी-२० क्रिकेटमध्ये इतिहास रचला. रोहितच्या कारकिर्दीतील नवीन कामगिरी पाहून त्याचे चाहते आनंदी झाले. या विक्रमासाठी कर्णधारावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना इंदूरच्या होळकर स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात भारताने अफगाणिस्तानवर सहा विकेट्सनी मात करत मालिकेत २-० ने अशी विजयी आघाडी घेतली. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानचा संघ प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १७२ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात भारताने शिवम-यशस्वी यांच्या अर्धशतकाच्या जोरावर १४.४ षटकांत ४ विकेट गमावत १७३ धावा करून सामना जिंकला.

# रोहित-हार्दिकमध्ये अहंकार उफाळून येणार?

## रोहितच्या नेतृत्वाखाली तो एक मजबूत अष्टपैलू खेळाडू बनला : युवराज

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**IPL 2024 मध्ये हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करणार आहे. त्याने टीम इंडियाचा नियमित कॅप्टन रोहित शर्माची जागा घेतली. रोहित आता हार्दिकच्या नेतृत्वाखाली येणार आहे. हार्दिक केवळ कर्णधार बनण्याच्या अटीवर मुंबई इंडियन्समध्ये आला होता. जेव्हा त्याची गुजरात टायटन्समधून मुंबई फ्रँचायझीमध्ये बदली करण्यात आली.**









आणि त्याला कर्णधार बनवण्यात आले तेव्हा रोहित शर्माच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर हार्दिकवर हल्ला चढवला होता. हार्दिकला हिटमॅनऐवजी कर्णधार बनवणे चाहत्यांना आवडलेलं नाही. यानंतर टी-20 वर्ल्डकपमध्येही हार्दिकची कर्णधार होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. याचा अर्थ टीम इंडियातही रोहितला हार्दिकच्या नेतृत्वाखाली खेळावे लागू शकते. हार्दिक पांड्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळत असे. रोहितच्या नेतृत्वाखाली तो एक मजबूत अष्टपैलू खेळाडू बनला. दोघांमध्ये चांगले बॉन्डिंग झाले आहे पण आता ही केमिस्ट्री अशीच राहणार का? गेल्या काही आठवड्यांपासून ही चर्चा सुरू आहे. याबाबत माजी क्रिकेटर युवराज सिंगला विचारण्यात आले. युवराज म्हणाला की, 'जेव्हा खेळाडू एकत्र क्रिकेट खेळतात तेव्हा या सर्व गोष्टी घडतात. खेळाडूंच्या एकमेकांविरुद्ध काही तक्रारी असतील तर त्यांनी नक्की बसून चर्चा करावी. हार्दिक जेव्हा मुंबई इंडियन्सकडून खेळला तेव्हा रोहितने सर्वोत्तम कामगिरी केली. हार्दिकचा लोड पाहून रोहित त्याला अतिशय हुशारीने गोलंदाजी करायला लावायचा. बरं, मला काही प्रॉब्लेम दिसत नाही पण जर काही असेल तर आपण दोघांनी त्याबद्दल बोलायला हवं. युवराज म्हणतो, 'जेव्हाही तुम्ही देशासाठी खेळता तेव्हा तुमचे प्राधान्य सर्व काही बाजूला ठेवून 100 टक्के द्यायचे असते. हे दोघेही व्यावसायिक आहेत. जर त्यांच्यात काही वाद असेल तर त्यांनी तो बाजूला ठेवावा आणि देशासाठी 100 टक्के द्यावे. युवराजने रोहित शर्माचेही खूप कौतुक केले. तो म्हणाला की, 'मी म्हणू शकतो की रोहित एक अद्भुत कर्णधार आहे. त्याच्या खात्यात 5 आयपीएल ट्रॉफी आहेत. त्याने आम्हाला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत नेले. तो आयपीएल आणि भारतातील सर्वोत्तम कर्णधारांपैकी एक आहे.

### चाहत्यांना आवडलेलं नाही

रोहित शर्माच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर हार्दिकवर हल्ला चढवला होता. हार्दिकला हिटमॅनऐवजी कर्णधार बनवणे चाहत्यांना आवडलेलं नाही. यानंतर टी-20 वर्ल्डकपमध्येही हार्दिकची कर्णधार होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. याचा अर्थ टीम इंडियातही रोहितला हार्दिकच्या नेतृत्वाखाली खेळावे लागू शकते.